अपर जिल्हाधिकारी संवर्गातील
अधिकाऱ्यांच्या बदलीने पदस्थापनेबाबत

# महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग**

**शासन आदेश क्र. बदली-२०२३/प्र.क्र.१००/ई-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २७ जुलै, २०२३

**संदर्भ**:- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.
२) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९ /कार्या.१२, दि. १४.०७.२०२१.

**शासन आदेश :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील अधिसूचनेमधील नियम क्र. २ (२) (ग) नुसार अतिरिक्त जिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गास विभागीय संवर्ग वाटप नियम, २०२१ हे लागू होणार नाहीत, असे स्पष्ट केले आहे.

२. सबब, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४) (एक) (दोन) व ४ (५) मधील तरतुदींनुसार, अपर जिल्हाधिकारी संवर्गातील बदलीपात्र/विनंतीनुसार/नियुक्तीच्या प्रतिक्षेतील अधिकाऱ्यांची खाली नमूद केलेल्या त्यांच्या नावांसमोर स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याची पदस्थापना | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | श्रीमती राजलक्ष्मी शफीक शाह | उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय,नागपूर | अपर जिल्हाधिकारी, चिमूर, जि. चंद्रपूर या रिक्त पदावर. |
| २. | श्री. विजय सहदेवराव भाकरे | उपायुक्त (करमणुक कर), विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती | अपर जिल्हाधिकारी, अहेरी, जि. गडचिरोली या रिक्त पदावर. |
| ३. | श्री. रामदास देविदास सिध्दभट्टी | अपर जिल्हाधिकारी, अमरावती | अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली या रिक्त पदावर. |
| ४. | श्री. अनंत बाबुराव गव्हाणे | अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे श्रीमती समिक्षा चंद्राकार यांच्या बदलीने रिक्त होणा-या पदावर. |

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याची पदस्थापना | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ५. | श्री. अंकुश भानुदास पिनाटे | अपर जिल्हाधिकारी, जालना | अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा येथे श्री. धनंजय गोगटे यांच्या बदलीने रिक्त होणा-या पदावर. |
| ६. | श्री. अरविंद रमेशराव लोखंडे | अपर जिल्हाधिकारी, लातूर | अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद येथे श्री. अनंत गव्हाणे यांच्या बदलीने रिक्त होणा-या पदावर |
| ७. | श्री. उन्मेश सुधाकर महाजन | उपायुक्त (पुनर्वसन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक | अपर जिल्हाधिकारी, गोंदिया या रिक्त पदावर |
| ८. | श्रीमती नयना काशिनाथ बोदांर्डे | उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे | उपायुक्त (पुनर्वसन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद या रिक्त पदावर |
| ९. | श्री. त्रिगुण शामराव कुलकर्णी | उपायुक्त (पुरवठा), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे | अपर जिल्हाधिकारी, बीड या रिक्त पदावर |
| १०. | श्रीमती समिक्षा रमाकांत चंद्राकार | उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | उपायुक्त (पुरवठा) ,विभागीय आयुक्त कार्यालय,पुणे येथे श्री. त्रिगुण कुलकर्णी यांच्या बदलीने रिक्त होणा-या पदावर. |
| ११. | श्रीमती वैशाली नंदकिशोर इंदाणी-उंटवाल | अपर जिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन योजना, पुणे. | उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे श्रीमती नयना बोदांर्डे यांच्या बदलीने रिक्त होणा-या पदावर. |
| १२. | श्री. धनंजय अनिल गोगटे | अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा | अपर जिल्हाधिकारी, नंदुरबार या रिक्त पदावर. |
| १३. | श्री.  सुनिल विठ्ठलराव यादव | अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जि. बीड | अपर जिल्हाधिकारी, लातुर येथे श्री. अरविंद लोखंडे यांच्या बदलीने रिक्त होणा-या पदावर. |
| १४. | श्री. विजयसिंह शंकरराव देशमुख | नियुक्तीच्या प्रतिक्षेत | अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई येथे श्री. सुनिल यादव यांच्या बदलीने रिक्त होणा-या पदावर. |
| १५. | श्री. सुरज रोहिदास वाघमारे | नियुक्तीच्या प्रतिक्षेत | अपर जिल्हाधिकारी, अमरावती येथे श्री. रामदास सिध्दभट्टी यांच्या बदलीने रिक्त होणा-या पदावर. |
| १६. | श्री. अमोल अभिमान यादव | नियुक्तीच्या प्रतिक्षेत | मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी या रिक्त पदावर |

२. उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांना दि. २७ जुलै, २०२३ (म.नं.) पासून स्तंभ क्रमांक ३ मधील नमूद सध्याच्या पदस्थापनेच्या पदावरून या आदेशानुसार एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. सदरील आदेश तात्काळ अंमलात येत असून उपरोक्त नमुद अधिकाऱ्यांनी बदलीनंतरच्या पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रूजू व्हावे.

३. सदर आदेश हेच कार्यमुक्ततेचे आदेश असून संबंधित विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी तसेच, संबंधित कार्यालय प्रमुख यांनी नव्याने स्वतंत्र आदेश काढण्याची आवश्यकता नाही.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहीत केलेल्या तरतूदींनुसार, पदस्थापनेच्या ठिकाणी पदग्रहणाकरीता संबंधित अधिकारी यांना रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्या धरून **सात दिवसांचा कालावधी तयारीसाठी दिला जातो** व **त्याशिवाय, प्रत्यक्ष कालावधीची गणना** पुढीलप्रमाणे करण्यात येईल :-

**(ए) त्याच जिल्ह्यामध्ये किंवा लगतच्या जिल्ह्यामध्ये** (म्हणजेच, कोणत्यातरी ठिकाणी सामायिक हद्द असणारा जिल्हा) एखाद्या ठिकाणी बदली झाली असता प्रवासासाठी **एक दिवस**;

**(बी)** वरील खंड (ए) मध्ये उल्लेखिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त **अन्य ठिकाणी** बदली झाली असता प्रवासासाठी **दोन दिवस** एवढा पदग्रहण अवधी संबंधित अधिकाऱ्यास अनुज्ञेय राहील.

परंतु, प्रस्तुत आदेशातील ज्या अधिकारी यांची त्यांच्या विनंतीनुसार बदली करण्यात आलेली आहे व जे अधिकारी नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत, अशा अधिका-यांना पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

५. सर्व संबंधित अपर जिल्हाधिका-यांना कळविण्यात येते की, वरील बदलीच्या पदावर रूजू होण्याकरीता संबंधित अधिकारी यांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.५.९.२०१८ अन्वये विहीत केलेल्या नमूद तरतुदींनुसार, त्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य सक्षम अधिकाऱ्याकडे सोपवावा. तसेच, संबधित अधिकारी नवीन नियुक्तीच्या जागी रुजू झाल्याबाबतचा अहवाल e1.revenue@maharashtra.gov.in तसेच, vijay.yadav82@nic.in या ई-मेलवर शासनास त्वरीत कळवावे.

६. सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, बदलीने पदस्थापना करण्यात आलेल्या वरील तक्त्यात नमूद सर्व अधिकाऱ्यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी दि. २७ जुलै, २०२३ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आलेले असल्याने सर्व संबंधित अधिकारी यांचे दि. २७ जुलै, २०२३ पर्यतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या पदावर काढण्यात यावे. दि. २८ जुलै, २०२३ नंतर संबंधित अधिकाऱ्याचे वेतन बदलीपूर्वी कार्यरत असलेल्या पदावर अदा केल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना याबाबत व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल व त्यांच्याविरुध्द नियमानुसार योग्य ती शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. सर्व संबंधित **अधिदान व लेखा अधिकारी / जिल्हा कोषागार अधिकारी** यांना सूचित करण्यात येते की, पदस्थापना करण्यात आलेल्या वरील तक्त्यात नमूद सर्व अधिकारी यांचे दि. २८ जुलै, २०२३ पासूनचे वेतन बदलीनंतरच्या पदस्थापनेच्या पदावर अदा करावयाचे आहे. **सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे**.

८. संबंधित अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहीत केलेल्या उक्त तरतूदींनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापूर्वी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुद्ध शासन निर्णय, क्र.संकीर्ण २०१६/ प्र.क्र.१८६/ १६/ कार्यासन १४, दि. २३.१२.२०१६ मधील तरतूदींनुसार **शिस्तभंगविषयक कारवाई** करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

९. सर्वसाधारण बदल्यांचे आदेश निर्गमित केल्यानंतर, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या **पदग्रहण अवधीतच**, बदली झालेल्या अधिकारी यांनी बदलीच्या ठिकाणी **रुजू** होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा **अनुपस्थितीचा कालावधी हा "अकार्यदिन" (dies non) म्हणून गणला जाईल**, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करू नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जांची दखल घेण्यात येणार नाही.

११. सदरहू बदली आदेशांनुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक ) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लघंन करणारी असल्यामूळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१२. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२३०७२७२०४४१८७७१९ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJAY RAMDAS YADAV

Digitally signed by VIJAY RAMDAS YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=ae4129cf04c57690cc0afe91f5a7ee83c834bf8ec9081fb5049d136688772be0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8BA1246ACA7B45D7883D90B3708953920A07AF440E2B9BF6B4A2506BDB374442, cn=VIJAY RAMDAS YADAV
Date: 2023.07.27 20:46:06 +05'30'

**( विजय रा. यादव )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

६. मा. अपर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. सर्व जिल्हाधिकारी
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१-मुंबई/२-नागपूर
१०.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
११.अधिदान लेखा अधिकारी/निवासी लेखा अधिकारी (संबंधित)
१२.संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
१३.संबंधित अपर जिल्हाधिकारी
१४.सह सचिव (ई-१) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१५.महसूल व वन विभाग कार्यासन ई-४ ई-४-अ, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१६.निवडनस्ती-कार्यासन ई-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

-*-*-*-